जा.क्र./आस्था/ १८२४ /२०२३
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव
दिनांक २० /१० /२०२३

# आदेश

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करण्याकरीता आवश्यक माहिती / कागदपत्रे सादर करण्याबाबत.

याव्दारे सूचित करण्यात येते की, कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये १२,२४ वर्षाच्या नियमित सेवेनंतरची, दोन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिनांक ०१/०१/२००६ पासून व ७ व्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये १०,२०,३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची, तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ दिनांक ०१/०१/२०१६ पासून अंमलात आणली आहे. त्याअनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा पहिला / दुसरा लाभ मंजूर करण्याची कार्यवाही आस्थापना विभागाकडून प्रस्तावित आहे.

त्याअनुषंगाने आस्थापना सूचीवरील कार्यरत संबंधित सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा पहिला / दुसरा लाभ ज्या तारखेस देय होता त्या मागील ६ वर्ष कालावधीतील गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व विवरणपत्र, मागासवर्गीय असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, विभागीय परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, हिंदी-मराठी भाषा सुट आदेश, संगणक अर्हता प्रमाणपत्र, परिविक्षाधीन कालावधी समाप्त आदेश, स्थायित्व प्रमाणपत्र, विभागीय चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित अहवाल इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत. आस्थापना सूचीवरील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे आवश्यक असलेले परिपूर्ण कागदपत्रे सादर करण्याबाबत तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून वैयक्तीक सेवां तपशीलाची पूर्तता होणार नाही अशा प्रकरणी संबंधित अधिकारी जबाबदार राहतील याबाबत आपल्या स्तरावरुन सुचित करण्यात यावे.

सदरची आवश्यक कागदपत्रे / माहिती आपल्या कार्यालयाच्या उपलब्ध अभिलेखे, मुळ सेवापुस्तक तसेच विचारक्षेत्रातील अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन,सोबत जोडलेल्या विवरणपत्र – अ व विवरणपत्र –ब मध्ये संकलित करुन एकत्रितरित्या स्वाक्षरीसह प्रमाणित करुन दिनांक १५/११/२०२३ पर्यंत इकडेस सादर करावी. जेणेकरुन कार्यवाही करणे शक्य होईल.

२०/१०/२३
(अविनाश गांगोडे)
**उपायुक्त (सा.प्र.)**
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**प्रति,**
१) आस्थापना अधिक्षक,म.न.पा. जळगांव.
२) वेतन लिपीक (सर्व),आस्थापना विभाग, म.न.पा. जळगांव.
३) सर्व संबंधित कार्यरत गट क कर्मचारी

**प्रत,**
मा. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांजकडे माहितीस्तव सविनय अग्रेषित.

E:\EST WINDOWS १०\आस्थापना विभाग\कालबद्ध\२४६४४.docx

Scanned with CamScanner

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकारी/ कर्मचारी यांनी मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणे सादर करण्याबाबत.

# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## आस्थापना विभाग

परिपत्रक क्र./जमपा/आस्था/२८३७/२०२३ दिनांक : २८/१२/२०२३.

**संदर्भ :-** १ ) शासन निर्णय क्रमांक : वशिअ-१२१४/ प्र.क्र.२६/११,दिनांक : २ जून,२०१४.

# परिपत्रक

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम,१९७९ च्या नियम १९ च्या पोटनियम (१) व त्याखालील टीप ३ अनुसार प्रत्येक शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांने (गट -ड मधील कर्मचारी वगळता) कोणत्याही सेवेतील / पदावरील आपल्या प्रथम नियुक्तीच्या वेळी व त्यानंतर शासन विहित करेल त्या-त्या वेळी विहित नमुन्यामध्ये आपले मत्ता व दायित्व याबाबतचे विवरण सादर करणे बंधनकारक आहे. तसेच संदर्भीय शासन नियमातील (४) (ब) मध्ये " अशा प्रकाराची त्या त्या वर्षाची वार्षिक मालमत्ता विवरणपत्रे सादर केली असणे ही राज्य शासनामधील **सर्व टप्प्यांवरील पदोन्नती,आश्वासित योजनेअंतर्गतच्या पदोन्नती, प्रतिनियुक्ती,विदेश दौरा** " यासाठी पुर्वअट म्हणून विहित करण्यात आलेली आहे. परिणामी कोणत्याही अधिकारी / कर्मचाऱ्यास आश्वासित व नियमित पदोन्नतीचा लाभ देण्यापुर्वी किंवा प्रतिनियुक्तीस अनुमती देण्यापूर्वी व कार्यालयीन विदेश दौऱ्यास अनुमती देण्यापूर्वी त्याने त्या वर्षाचे ३१ मार्च रोजीचे मालमत्ता विवरणपत्र सादर केले नसल्यास त्यांना पदोन्नती / आश्वासित योजनेतील पदोन्नती देण्यात येऊ नये." अशी तरतूद आहे.

तरी सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांनी सन २०२३-२०२४ [३१ मार्चच्या स्थितीस अनुसरुन] **(गट -ड मधील कर्मचारी वगळून)** मत्ता व दायित्व यांची वार्षिक विवरणे विहित नमुन्यात आपआपल्या विभागप्रमुखांकडे बंद पाकीटात दि.३१ मे २०२४ पर्यंत सादर करावीत.सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या अधिनस्त असलेल्या कर्मचाऱ्यांची एकत्रीत विवरणे आस्थापना विभागात संबंधित कार्यासन वेतन लिपीकांकडे दि. ३१ मे २०२४ पर्यंत सादर करावी. सद्यस्थितीत कालबद्ध पदोन्नती / आश्वासित प्रगती योजना प्रस्तावावर कार्यवाही सुरु असून सदर कागदपत्राची पूर्तता न केल्यास व त्या कारणास्तव आपण सदर लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कर्मचारी यांची असेल याची नोंद घ्यावी.

सदर आदेशाचे तात्काळ पालन करावे.

२८/१२/२३

(अविनाश गांगोडे)
**उपायुक्त (सा.प्र.)**
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**प्रति,**
**१ ) विभाग प्रमुख (सर्व) ,**
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव.
**२ ) मुख्याध्यापक,**
उर्दू प्राथमिक विद्यालय क्र. १ ते २,

D:\F Drive Backup\NEW COMPUTER\EST ALL DOC\ORDER\ALL HEAD OF DEPARTMENT/ MATTA & DAYITVA VARSHIK VIVARANE SADAR KARNEBABAT 24897

**प्रतिलिपी :-**
१ ) मा. अतिरिक्त आयुक्त
२ ) उपायुक्त,(महसुल)
३ ) मुख्य लेखा परिक्षक
( ४ ) मुख्य लेखाधिकारी
( ५ ) आस्थापना अधिक्षक
( ६ ) संबंधित सर्व वेतन लिपीक

**प्रत,**मा.आयुक्त,जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांचकडे माहितीस्तव सविनय अग्रेषित.

Scanned with CamScanner

जा.क्र./आस्था/१२५६/२०२४
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव
दिनांक : १८/०७/२०२४

# परिपत्रक

**विषय:-** कालबद्ध पदोन्नती / सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसंबंधीचे कागदपत्र सादर करणेबाबत.

**संदर्भ :-** १) जा.क्र./आस्था/१९२४/२०२३ दिनांक २०/१०/२०२३.
२) परिपत्रक क्र./जमपा/आस्था/२७३७/२०२३ दिनांक २८/१२/२०२३.
३) जा.क्र./आस्था/४०७/२०२४-२५ दिनांक ०९/०५/२०२४.

ज्या अर्थी दिनांक ३१/१२/२०२३ अखेर कार्यरत असलेल्या जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापना सुचिवरील कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती / सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाचा लाभ देणेकामी विभागीय पदोन्नतीची बैठक प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने पात्र कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही आस्थापना विभागाकडून सुरु आहे, सबब विचारक्षेत्रातील व पात्र कर्मचारी यांचेकडून सदर लाभ मिळणेकामी आवश्यक ते कागदपत्रांची पूर्तता करणेकामी उक्त संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी सूचित करणेत आलेले आहे. तथापि अदयापही बऱ्याच कर्मचारी यांचेकडून वैयक्तिक सेवा तपशीलाची व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता झालेली नाही.

सबब याव्दारे अंतिमत: सूचित करणेत येते कि, सदर कामी विभागीय पदोन्नती समितीची बैठक ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवडयात प्रस्तावित आहे. सबब सदर बैठकीपुढे प्रस्ताव सादर करणेकामी २६ जुलै पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या कर्मचाऱ्यांचेच प्रस्ताव विचारात घेणेत येणार आहेत, सबब सर्व संबंधित कर्मचारी यांनी २६ जुलै पर्यंत वैयक्तिक सेवा तपशिलाची / कागदपत्राची पूर्तता करणेची दक्षता घ्यावी, वैयक्तिक सेवा तपशीलाची / कागदपत्राची पूर्तता न झाल्यामुळे जर लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी व व्यक्तिश: वैयक्तिक जबाबदारी संबंधितांचीच असेल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

वैयक्तिक सेवा तपशीलाची / कागदपत्राची पूर्तता करणेकामी व अधिक माहितीकामी आपले वेतन लिपीकांशी संपर्क साधावा व लागू असेल त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करणेत यावी.

**आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे**

१) देय लाभाच्या दिनांकापासून मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल.
२) देय लाभाच्या दिनांकाच्या मागील तसेच सन २०२३-२०२४ चे मत्ता व दायित्व विवरणपत्र.
३) जात वैधता प्रमाणपत्र.
४) देय लाभाच्या पदासाठीची शैक्षणिक अर्हता धारण केल्याची कागदपत्रे.
५) विभागीय परिक्षा उत्तीर्ण / सूट प्रमाणपत्र.
६) संगणक अर्हता प्रमाणपत्र / सूट प्रमाणपत्र.
७) मराठी हिंदी भाषा प्रमाणपत्र / सूट प्रमाणपत्र.
८) परिविक्षाधीन कालावधी समाप्ती आदेश.
९) स्थायित्व प्रमाणपत्र.
१०) ना देय- ना चौकशी प्रमाणपत्र.
११) फौजदारी प्रकरण नसल्याचे प्रमाणपत्र.

१८/०७/२४
(अविनाश गांगोडे)
**उपायुक्त (सा.प्र.)**
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**प्रति,**
**सर्व अधिकारी व कर्मचारी,**
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.

E:\EST WINDOWS 10\परिपत्रक\सर्व विभाग प्रमुख\कालबद्ध पदोन्नती कागदपत्रे सादर करणेबाबत 25548.docx

Scanned with CamScanner

**कालबध्द पदोन्नती योजना / सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / तीन लाभाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना इ. बाबत प्रमुख तरतूदी अवलोकनार्थ उपलब्ध करुन देणे बाबत.**

## जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**आस्थापना विभाग**

परिपत्रक क्र./जमपा/आस्था/ ९३२८ /२०२४ दिनांक २५/०७ /२०२४.

## परिपत्रक

असे निदर्शनास आलेले आहे कि, कालबध्द पदोन्नती योजना / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / सातवा वेतन आयोगानुसार तीन लाभाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लाभ अनुज्ञेय होणेसाठीचे पात्रतेबाबत तसेच त्याकामी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांबाबत अधिकारी / कर्मचारी यांचे मध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम व चुकीच्या धारणा आहेत, सबब उक्त नमूद लाभांच्या अनुज्ञेयतेबाबत / पात्रतेबाबत तसेच या योजनेंची प्रमुख तरतुदी,मार्गदर्शक तत्वे इ.बाबी अधिकारी / कर्मचारी यांचे माहितीस्तव याद्वारे उपलबध करुन देणेत येत आहे.

सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.एसआरव्ही/१०९५/प्र.क्र.१/९५/बारा,मंत्रालय,मुंबई दि.०८ जुन १९९५ अन्वये गट क व गट ड मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासाठी **दि.०१ ऑक्टोंबर १९९४** पासून **कालबध्द पदोन्नती योजना** लागू करणेत आलेली आहे.

या योजनेनुसार

१. गट क व गट ड मधील पद धारकांना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्यात येईल.

२. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती साखळीतील पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नाही , अशा कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणीतील पुढील वेतनश्रेणी देणेत येईल ( शासन निर्णयाच्या परिशिष्टात नमूद केले नुसार)

३. या योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीसाठी विहीत कार्यपध्दती, सेवाजेष्ठता, पात्रता अर्हता, विभागीय परिक्षा इ.बाबीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

४. संपूर्ण सेवाकाळात १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ श्रेणी केवळ एक वेळ अनुज्ञेय असेल.

५. ज्या कर्मचाऱ्यांना यापूर्वी दोन पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना या योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणार नाही.

६. गट-ड मधील कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी दिली तरी त्यांचे सेवानिवृत्ती वय ६० वर्ष हेच असेल मात्र गट-क मध्ये पदोन्नती पदावर पदोन्नती मिळाल्यास सेवानिवृत्ती वय ५८ वर्ष असेल.

वित्त विभाग,शा.नि.क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३ मंत्रालय,मुंबई,४०००३२ दि.२० जुलै २००१ अन्वये **०१ ऑक्टोबर १९९४** पासून लागू असलेली **कालबध्द पदोन्नती योजना** बंद करणेत येवून त्याऐवजी **दि.०१ ऑगस्ट २००१** पासून **सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना** सुरु करणेत आलेली आहे.

या योजनेनुसार

१. ८०००-२७५-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना ही योजना लागू होईल.

२..

Scanned with CamScanner

२. संबंधित पदावरील १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतरच लाभ अनुज्ञेय होईल.

३. सेवेत दोन किंवा त्याहून अधिक पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

४. योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय होईल. पदोन्नतीचे पद उपलब्ध नसलेल्या एकाकी पदांना शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ मधील वेतनश्रेणी देय होईल.

५. योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय असल्याने वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता,पात्रता,जेष्ठता,अर्हता परिक्षा,विभागीय परिक्षा,इ.बाबीची पूर्तता व पदोन्नतीची कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक राहील. एकाकी पदासाठी गोपनीय अहवालाच्या आधारे पात्रता तपासण्यात येईल.

६. या योजनेचा लाभ संपूर्ण सेवेत फक्त एक वेळ अनुज्ञेय राहील. ज्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत लाभ मिळालेला आहे, त्यांना पुन्हा वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

७. वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यावर वेतन निश्चिती नियमित पदोन्नती प्रमाणेच होईल. त्याच वेतनश्रेणीत नियमित / कार्यात्मक पदोन्नती (प्रत्यक्ष पदोन्नती) मिळाल्यावर पुन्हा वेतन निश्चिती लाभ मिळाणार नाही.

८. नियमित पदोन्नती,नाकारलेल्या तसेच पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही.

वित्त विभाग, शा.नि.क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/सेवा-३ मंत्रालय,मुंबई-४०००३२ दि.०१ एप्रिल २०१० अन्वये **दि.०१ ऑगस्ट २००१** पासून सुरु असलेली **सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना** ही **दि.०१ ऑक्टोबर २००६** पासून **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना** या नावाने सुधारित स्वरुपात लागू करणेत आलेली आहे.

या योजनेनुसार

१. ही योजना रु.१५६००-३९००+५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू राहील.

२. संपूर्ण सेवा कालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना मंजूर करण्यात येईल.

३. तीन किंवा त्यापेक्षा जास्त पदोन्नत्या मिळालेल्या कर्मचाऱ्यांना लागू नाही.

४. दोन पदोन्नत्या मिळालेल्या कर्मचाऱ्यास एक लाभ मिळेल.

५. एक पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यास दोन लाभ मिळतील.

६. १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर पहिला लाभ,पहिला लाभ मिळाल्यांनतर १२ वर्षांनी म्हणजेच एकूण २४ वर्षांनी दुसरा लाभ मिळेल.

७. कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत मिळालेला लाभ पहिला लाभ समजला जाईल.

८. दर्जोन्नती झालेली असल्यास तो पहिला लाभ समजला जाईल.

(उदा.कनिष्ठ अभियंता- चार वर्षानंतर श्रेणीवाढ- शाखा अभियंता)

९. एक किंवा दोन पदोन्नती नंतर पदोन्नतीचे पद उपलब्ध नसेल तर एकाकी पदाच्या कार्यपध्दतीनुसार लाभ देय होईल.

१०. लाभ दिल्यानंतर प्रत्यक्ष त्या पदावर पदोन्नती झाल्यास पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ मिळणार नाही.

११. ज्या पदाची वेतन संरचना मंजूर करण्यात येणार आहे, ज्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळण्यासाठी विहीत केलेल्या अटी-शर्तीची पूर्तता झाले नंतरच लाभ अनुज्ञेय होईल. तसेच पदोन्नतीसाठी विहीत

२..

Scanned with CamScanner

केलेली गोपनीय अहवालाची किमान सरासरी प्रतवारी प्राप्त करणे आवश्यक राहील,त्याशिवाय लाभ देय होणार नाही.

१२. पहिल्या लाभानंतर त्या पदावरील पदोन्नतीसाठी अपात्र ठरला किंवा पदोन्नती नाकारली तर लाभ काढून घेतला जाईल, तसेच दुसऱ्या लाभासाठी विचार केला जाणार नाही. पदोन्नती स्विकारल्यानंतर १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर दुसरा लाभ मंजूर केला जाईल.

१३. पहिला / दुसरा लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारली किंवा अपात्र ठरला तर देणेत आलेले लाभ काढून घेणेत येतील.

१४. लाभ काढून घेतल्यानंतर लाभ दिलेले नव्हते असे समजून फेर वेतन निश्चिती केली जाईल.

१५. सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेसाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे (शा.नि.क्र.वित्त विभाग वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा-३ दि.०१/०७/२०११)

१६. या योजनेखाली पहिला / दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेणेत येतील, मात्र दिलेल्या लाभाची वसूली करण्यात येणार नाही (शा.नि.क्र.वित्त विभाग आप्रयो-१०१५ / प्र.क्र.१११/ २०१५/सेवा-३ दि. २३ डिसेंबर २०१५) (एकाकी पदासाठी-आ.प्र.यो.१०१५/प्र.क्र.१११/२०१५ सेवा-३ दि.२३/१२/२०१५)

वित्त विभाग शा.नि.क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०११ सेवा-३ **दि.०२ मार्च २०१९** अन्वये **तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि.०१/०१/२०१६** पासून लागू करणेत आलेली आहे.

या योजनेनुसार

१. १०,२०,३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर संपूर्ण सेवा काळात एकूण तीन लाभ देय होतील.

२. एस-२० वेतनस्तर पर्यंत वेतन घेणाऱ्या कर्मचारी-अधिकारी यांना लागू राहील. एस-२१ मध्ये गेल्यास लाभ मिळणार नाही.

३. दोन पदोन्नत्या मिळाल्या असतील तर एक लाभ अनुज्ञेय होईल.

४. तीन पदोन्नत्या मिळाल्या असतील लाभ अनुज्ञेय नाही.

या योजनेच्या लाभासाठी पदोन्नतीच्या पदाची विहीत अर्हता,जेष्ठता,पात्रता,अर्हता परिक्षा,विभागीय परिक्षा,गोपनीय अहवलाची प्रतवारी विभागीय चौकशी,न्यायिक प्रकरण प्रलंबित नसणे, यथास्थिती जात वैधता प्रमाणपत्र इ.पदोन्नतीच्या कार्यपध्दतीची पूर्तता असणे आवश्यक आहे.

५. कालबध्द पदोन्नती,सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना,सुधारित आश्वासित प्रगती योजना या अंतर्गत पहिला,दुसरा लाभ घेतला असेल ते या योजनेअंतर्गत पहिला व दुसरा लाभ असल्याचे समजण्यात येईल.

६. दर्जोन्नतीचा लाभ प्रकरणपरत्वे पहिला / दुसरा लाभ समजण्यात येईल.

७. दि.०१/०१/२०१६ पूर्वी पहिला लाभ मिळाला असेल तर दुसरा लाभ (१२+८) २० वर्षानंतर व तिसरा लाभ दुसऱ्या लाभापासून (२०+१०) १० वर्षानंतर आणि दि.०१/०१/२०१६ पूर्वी दुसरा लाभ मिळाला असेल तर तिसरा लाभ दुसऱ्या लाभापासून (२४+६) सहा वर्षानंतर मिळेल.

८. प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या किंवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देणेत आलेले लाभ काढून घेणेत येतील, तथापि वसुली केली जाणार नाही व लाभापूर्वीच्या स्थितीनुसार वेतन निश्चिती करण्यात येईल.

९. रोजंदारी,कंत्राटी,तदर्थ नियुक्त कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.



Scanned with CamScanner

या सर्व योजनांचा लाभ अनुज्ञेय होणेसाठी पदोन्नतीच्या पदाची पात्रता असणे आवश्यकच नाही, तर बंधनकारक आहे, सबब पदोन्नतीसाठी ची अर्हता,पात्रता,जेष्ठता,विभागीय परिक्षा इ.सर्व अटी व पदोन्नतीची कार्यपध्दती ही वेळोवेळी शासन निर्णयानुसार निश्चित केलेली आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.एस.आर.व्ही.२०१८/ प्र.क्र.१५९/कार्यासन-१२ दि.०१ ऑगस्ट २०१९ अन्वये पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाही बाबतची एकत्रित मार्गदर्शन तत्त्वे विहीत करणेत आलेली आहेत. या मार्गदर्शन तत्वानुसारच कालबध्द पदोन्नती योजना / सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अंतर्गत देय लाभासाठीची पात्रता तपासण्यात येत असते, सबब सर्व अधिकारी यांनी सदर लाभ अनुज्ञेय होणेसाठी आपली पात्रता या मार्गदर्शक तत्वानुसार तपासणे आवश्यक आहे व त्यादृष्टीने आवश्यक त्या बाबींची पूर्तता करणे क्रमप्राप्त आहे. त्याकामी सर्व संबंधित अधिकारी-कर्मचारी यांना सदर मार्गदर्शकतत्त्वांचे तरतूदींचे अवलोकन करावे व आवश्यक त्या बाबींची विहीत मुदतीत पूर्तता होईल याची दक्षता घ्यावी.

**सुलभ संदर्भासाठी पूर्तता करावयाच्या बाबींची यादी खालील प्रमाणे**

१. देय दिनांकाच्या मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवाल.
२. सेवा प्रवेश नियमानुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव.
३. ज्या पदाच्या सेवा प्रवेश नियमामध्ये तांत्रिक परिक्षा विहीत केलेल्या आहेत त्या परिक्षा उत्तीर्ण होणे.
४. विभागीय परिक्षा नियमानुसार सेवा प्रवेशोत्तर विभागीय परिक्षा व पदोन्नतीसाठीची विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे.
५. पदोन्नतीसाठीच्या सर्व अनिवार्य परिक्षा उत्तीर्ण होणे (संगणक अर्हता,मराठी-हिंदी भाषा परिक्षा) अगर सूट प्रमाणपत्र सादर करणे.
६. परिविक्षाधीन कालावधी समाप्ती आदेश.
७. स्थायित्व प्रमाणपत्र.
८. जात वैधता प्रमाणपत्र.
९. मत्ता व दायित्व विवरण पत्र (देय लाभासाठी आवश्यक असलेले व अद्ययावत)
१०. वयाच्या ५०/५५ नंतर सेवेत ठेवण्याबाबतचे पुर्नविलोकन
११. विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण माहिती / प्रमाणपत्र
१२. संशयास्पद सचोटी बाबत माहिती (यादीत समावेश नसणे)
१३. अनिवार्य प्रशिक्षण (असल्यास)

येणे प्रमाणे सर्व बाबी विचारात घेवून कर्मचाऱ्यास खालील बाबीच्या अनुषंगाने स्वत:स कोणता लाभ देय होतो किंवा नाही याची पडताळणी करता येईल.

**छाननी / पडताळणी तक्ता**

| | | |
|---|---|---|
| १. | नांव - | |
| २. | नियुक्तीचे पद / सध्याचे पद | |
| ३. | नियुक्ती दिनांक / सध्याच्या पदावरील नियुक्ती दिनांक | |
| ४. | सेवा प्रवेश नियमानुसार पदाची शैक्षणिक अर्हता व अनुभव | |
| ५. | सेवा प्रवेशानुसार पदाची शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत आहे काय ? | होय / नाही. |



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ६. | जात- | |
| ७. | जात वैधताप्रमाणपत्र लागू आहे काय ?<br>लागू असल्यास जात वैधताप्रमाणपत्र आहे काय ? | होय / नाही. |
| ८. | संगणक अर्हता धारण केलेली आहे काय ?<br>असल्यास प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही. |
| ९. | तांत्रिक परिक्षा आवश्यक आहे काय ?<br>असल्यास उत्तीर्ण केली आहे काय ?<br>प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही.<br>होय / नाही. |
| १०. | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाला आहे काय ?<br>आदेश प्रत सादर केली आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही. |
| ११. | स्थायित्व प्रमाणपत्र आहे काय ?<br>सादर केले आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही. |
| १२. | विभागीय परिक्षा / पदोन्नतीसाठीची परिक्षा उत्तीर्ण आहे काय<br>प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही. |
| १३. | मत्ता / दायित्व प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | होय / नाही. |
| १४. | विभागीय चौकशी प्रस्तावित / सुरु / प्रलंबित आहे काय ? | होय / नाही. |
| १५. | शास्ती / शिक्षेच्या अंमलाखाली आहे काय ? | होय / नाही. |
| १६. | न्यायिक प्रकरण सुरु आहे काय ? | होय / नाही. |
| १७. | न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे काय ?<br>i) शिक्षेच्या अंमलाखाली आहे काय ?<br>ii) शिक्षेस स्थगिती दिलेली आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही.<br>होय / नाही. |
| १८. | संशयास्पद सचोटी यादीत नाव आहे काय ? | होय / नाही. |
| १९. | अनिवार्य प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे काय ? | होय / नाही. |
| २०. | आवश्यक ते सर्व गोपनीय अहवाल सादर केलेले आहेत काय ? | होय / नाही. |
| २१. | आवश्यक गुणांकन / प्रतवारी प्राप्त आहे काय ? | होय / नाही. |
| २२. | पदोन्नतीचे पद- | |
| २३. | पदोन्नतीचे पद व वेतनश्रेणी | |
| २४. | पदोन्नतीच्या पदाची शैक्षणिक अर्हता,अनुभव,तांत्रिक अर्हता | |
| २५. | पदोन्नतीच्या पदाची उक्त अर्हता धारण केली आहे काय ? | होय / नाही. |
| २६. | एकाकी पदासाठी गोपनीय अहवालाची किमान सरासरी प्रतवारी / गुणांकन प्राप्त आहे काय ? | होय / नाही. |

**पदोन्नत्यांची संख्या**

| | | | |
|---|---|---|---|
| २७. | १. | ३१ जुलै २००१ पर्यंत मिळालेल्या एकूण पदोन्नती संख्या / लाभ संख्या - | १/२/३ |
| | २. | ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत मिळालेली एकूण पदोन्नती संख्या /लाभ संख्या - | १/२/३ |

५..

Scanned with CamScanner

| मिळाली असल्यास प्रथम / द्वितीय / तृतीय लाभाचा / पदोन्नतीचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| २८. | अ.क्र. | पदोन्नतीचे पद | वरिष्ठ श्रेणी | दिनांक |
| | १. | | | |
| | २. | | | |
| | ३. | | | |

पदांची शैक्षणिक अर्हता तपासणीकामी त्या-त्या वेळी अस्तित्वातील सेवा प्रवेश नियमावली, पद मंजूरी आदेश पहावेत.

उक्त नमूद मुद्यांच्या अनुषंगाने अधिकारी-कर्मचारी आपली लाभासाठीची पात्रता तपासू शकतात व ज्या बाबींची पूर्तता करणे बाकी असेल, तर लाभाच्या अनुज्ञेयतेसाठी त्याची पूर्तता करणेकामी आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी.

(अविनाश गांगोडे)
**उपायुक्त (सा.प्र.)**
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**प्रति,**
**सर्व संबंधित गट-क व गट - ड अधिकारी कर्मचारी,**
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव.

E:\EST WINDOWS १०\परिपत्रक\सर्व विभाग प्रमुख\कालबध्द पदोन्नती - आश्वासित प्रगती योजना बाबत तरतुदी १८-१२.docx

**प्रतिलिपी :-**
१) मा.अतिरिक्त आयुक्त
२) उपायुक्त (सर्व)
३) मुख्यलेखा परिक्षक
४) मुख्यलेखाधिकारी
५) सहाय्यक आयुक्त (सर्व)
६) आस्थापना अधिक्षक
७) वरिष्ठ लिपीक,आस्थापना (सर्व)
८) सर्व वेतन लिपीक
९) सर्व विभाग प्रमुख (सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणावे.)

**प्रत,**
**१.मा.** आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांजकडे माहितीस्तव सविनय अग्रेषित.

Scanned with CamScanner

# परिशिष्ट अ

## छाननी / पडताळणी तक्ता

(अधिकारी / कर्मचारी यांचे स्वयंमुल्यांकनासाठी)

| | | |
|---|---|---|
| १. | नांव - | |
| २. | नियुक्तीचे पद / सध्याचे पद | |
| ३. | नियुक्ती दिनांक / सध्याच्या पदावरील नियुक्ती दिनांक | |
| ४. | सेवा प्रवेश नियमानुसार पदाची शैक्षणिक अर्हता व अनुभव | |
| ५. | सेवा प्रवेशानुसार पदाची शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करीत आहे काय ? | होय / नाही. |
| ६. | जात- | |
| ७. | जात वैधताप्रमाणपत्र लागू आहे काय ?<br>लागू असल्यास जात वैधताप्रमाणपत्र आहे काय ? | होय / नाही. |
| ८. | संगणक अर्हता धारण केलेली आहे काय ?<br>असल्यास प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही. |
| ९. | तांत्रिक परिक्षा आवश्यक आहे काय ?<br>असल्यास उत्तीर्ण केली आहे काय ?<br>प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही.<br>होय / नाही. |
| १०. | परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाला आहे काय ?<br>आदेश प्रत सादर केली आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही. |
| ११. | स्थायित्व प्रमाणपत्र आहे काय ?<br>सादर केले आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही. |
| १२. | विभागीय परिक्षा / पदोन्नतीसाठीची परिक्षा उत्तीर्ण आहे काय ?<br>प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही. |
| १३. | मत्ता / दायित्व प्रमाणपत्र सादर केले आहे काय ? | होय / नाही. |
| १४. | विभागीय चौकशी प्रस्तावित / सुरु / प्रलंबित आहे काय ? | होय / नाही. |
| १५. | शास्ती / शिक्षेच्या अंमलाखाली आहे काय ? | होय / नाही. |
| १६. | न्यायिक प्रकरण सुरु आहे काय ? | होय / नाही. |

७..

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| १७. | न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे काय ?<br>i) शिक्षेच्या अंमलाखाली आहे काय ?<br>ii) शिक्षेस स्थगिती दिलेली आहे काय ? | होय / नाही.<br>होय / नाही.<br>होय / नाही. |
| १८. | संशयास्पद सचोटी यादीत नाव आहे काय ? | होय / नाही. |
| १९. | अनिवार्य प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे काय ? | होय / नाही. |
| २०. | आवश्यक ते सर्व गोपनीय अहवाल सादर केलेले आहेत काय ? | होय / नाही. |
| २१. | आवश्यक गुणांकन / प्रतवारी प्राप्त आहे काय ? | होय / नाही. |
| २२. | पदोन्नतीचे पद- | |
| २३. | पदोन्नतीचे पद व वेतनश्रेणी | |
| २४. | पदोन्नतीच्या पदाची शैक्षणिक अर्हता, अनुभव,तांत्रिक अर्हता | |
| २५. | पदोन्नतीच्या पदाची उक्त अर्हता धारण केली आहे काय ? | होय / नाही. |
| २६. | एकाकी पदासाठी गोपनीय अहवालाची किमान सरासरी प्रतवारी / गुणांकन प्राप्त आहे काय ? | होय / नाही. |

**पदोन्नत्यांची संख्या**

| | | | |
|---|---|---|---|
| २७. | १. | ३१ जुलै २००१ पर्यंत मिळालेल्या एकूण पदोन्नती संख्या / लाभ संख्या - | १/२/३ |
| | २. | ३१ डिसेंबर २०१५ पर्यंत मिळालेली एकूण पदोन्नती संख्या /लाभ संख्या - | १/२/३ |

**मिळाली असल्यास प्रथम / द्वितीय / तृतीय लाभाचा / पदोन्नतीचा तपशील**

| | अ.क्र. | पदोन्नतीचे पद | वरिष्ठ श्रेणी | दिनांक |
|---|---|---|---|---|
| २८. | १. | | | |
| | २. | | | |
| | ३. | | | |

Scanned with CamScanner

जा.क्र./आस्था/ १९४५ /२०२४
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव
दिनांक १२ / ०९/२०२४

# कार्यालयीन आदेश

**विषय** :- कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाच्या लाभाबाबत.

**संदर्भ** :- १) जा.क्र./आस्था/१२५६/२०२४ दिनांक १८/०७/२०२४ रोजीचे परिपत्रक.
२) माहे ऑगस्ट २०२४ रोजीचे पत्र.

ज्या अर्थी दिनांक ३१/१२/२०२३ अखेर कार्यरत असलेल्या जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापना सुचिवरील कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाचा लाभ देणेकामी पात्र कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही पूर्ण करणेबाबत सूचित करणेत आलेले आहे. तथापि ज्या अधिकारी / कर्मचारी यांचा वैयक्तिक सेवा तपशिल / कागदपत्रे अपूर्ण असल्याने त्यांचेकडून सदरची कागदपत्रे / सेवा तपशिल ची पूर्तता करणेबाबत उपरोक्त संदर्भीय परिपत्रक व पत्रान्वये संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना वेळोवेळी सूचित करणेत आलेले आहे. परंतू अदयापही काही अधिकारी / कर्मचाऱ्यांनी सेवा तपशिल / कागदपत्रे सादर करणेबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसून कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही. असे निदर्शनास आलेले आहे.

सबब दिनांक १५ सप्टेंबर, २०२४ पावेतो ज्या अधिकारी / कर्मचारी यांचे वैयक्तिक सेवा तपशिल / कागदपत्रे विहीत मुदतीत प्राप्त होतील अशाच अधिकारी / कर्मचारी यांचे कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाचा लाभ देणेकामी त्यानुसार परिपूर्ण प्रस्ताव इकडेस प्रस्ताव सादर करावेत.

तसेच ज्या अधिकारी / कर्मचारी यांचे वैयक्तिक सेवा तपशिल / कागदपत्रे दिनांक १५ सप्टेंबर, २०२४ नंतर प्राप्त होतील अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांचा विचार करणेत येऊ नये सदर प्रस्ताव हे पुढील पदोन्नती समिती बैठकीत सादर करणेत येतील.

१२/०९/२४
(अविनाश गांगोडे)
**उपायुक्त (सा.प्र.)**
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**प्रति,**
सर्व कार्यासन लिपिक, आस्थापना विभाग, म.न.पा. जळगांव.

**प्रतिलिपी :-**
१) आस्थापना अधिक्षक, म.न.पा. जळगांव.
२) वरिष्ठ लिपिक लिपीक,आस्थापना विभाग, म.न.पा. जळगांव.

E:\EST WINDOWS १०\आस्थापना विभाग\कालबद्ध\दि. १५ सप्टेंबर २०२४ पावेतो कागदपत्र सादर बाबत २५८२८.docx/१२-०९-२०२४

Scanned with CamScanner

# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

आस्थापना विभाग
दिनांक १६ / ०९ /२०२४

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाचा लाभ मंजूर करण्याकरिता आवश्यक माहिती / कागदपत्रे सादर करणे बाबत...

**संदर्भ :-** 1. मा. उपायुक्त (सा.प्र.) यांचेकडील जा.क्र. / आस्था /1924/2023 दि.20/10/2023 रोजीचे
2. आदेश.मा. उपायुक्त (सा.प्र.) यांचेकडील जा.क्र./आस्था /407/2024 दि.09/05/2024 रोजीचे आदेश.

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन विनंती प्रतिवेदन की, म.न.पा. आस्थापना सूचीवरील कर्मचाऱ्यांची प्रारुप सेवाजेष्ठता यादी सन-2022-23 प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सेवा प्रवेश नियम शासनाकडेस मान्यतेसाठी पाठविण्यात आलेली असून शासन निर्णय क्र. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई जमनपा-2020/प्र.क्र.184/ नवि-25 दि.16 फेब्रुवारी 2023 अन्वये म.न.पा. कर्मचारी सुधारीत आकृती बंधास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

म.न.पा. आस्थापना सूचीवरील कर्मचाऱ्यांना त्यांची शैक्षणिक पात्रता, गोपनिय अहवाल, जात पडताळणी इ. बाबींचा विचार करुन पात्र कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 54 (1) अन्वये आयुक्त यांनी पद निर्देशीत केलेला कोणताही अन्य अधिकारी, मुख्यलेखा परिक्षक, संबंधीत विभाग प्रमुख व आयुक्ताने नाम निर्देशीत केलेला फक्त एक अन्य अधिकारी यांची मिळून बनलेली एक कर्मचारी निवड समिती राहील.

त्याअनुषंगाने शासन निर्णय वित्त विभाग क्र. वेतन 1119/ प्र.क्र.03/2019 सेवा 3 दि.02 मार्च 2019 अन्वये एका वेतनश्रेणीत 10/20/30 वर्ष नियमीत सेवा झालेल्या पात्र कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेकरीता कर्मचारी पदोन्नती निवड समिती खालील प्रमाणे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

१. आयुक्त - अध्यक्ष

२. मुख्यलेखा परिक्षक – सदस्य

३. उपायुक्त (सा.प्र.)- सदस्य

४. अतिरिक्त आयुक्त -सदस्य

५. आस्थापना अधिक्षक - सदस्य सचिव

तरी उक्त नमुद केलेनुसार समितीचे गठण करणे व समितीच्या बैठक आयोजीत करणेकरिता दिनांक, वेळ व स्थळ निश्चित करुन मिळणेस मान्यतेस्तव सादर

(स्वाक्षरी) १९/९/२४

(स्वाक्षरी)
म० आस्थापना अधिक्षक सो.

दि. २६/९ रोजी
दु. १.०० वा.

मा. उपायुक्त सो. (सा.प्र.)
(स्वाक्षरी) 19/09/24

(स्वाक्षरी)
मा. आयुक्त सो. 19/09

Scanned with CamScanner

जा.क्र.: जमपा/आस्था. /2036/२०२४
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव
दिनांक :- 23/०९/२०२४

## कार्यालयीन आदेश

जळगांव शहर महानगरपालिकेतील आस्थापना सुचिवरील अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांची शैक्षणिक अर्हता, सेवा ज़ेष्ठता, गोपनिय अहवाल इ.बाबींचा विचारं करुन एकाच पदावर १०,२०,३० वर्षे नियमीत सेवा पुर्ण झाल्याने कालबद्ध पदोन्नती / सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना लागू करणेकरिता मा. आयुक्त यांचे दिनांक १९/०९/२०२४ रोजीच्या मान्यतेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) अन्वये खालील प्रमाणे **कर्मचारी पदोन्नती निंवड समिती** गठीत करण्यात येत आहे.

१. आयुक्त - अध्यक्ष
२. मुख्य लेखा परिक्षक - सदस्य
३. उपायुक्त (सा.प्र.) - आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेला सदस्य
४. अतिरिक्त आयुक्त - आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेला अतिरिक्त सदस्य
५. आस्थापना अधिक्षक - विभाग प्रमुख तथा सदस्य सचिव

23/09/24
(अविनाश गांगोडे)
**उपायुक्त (सा.प्र.)**
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

(मा.आयुक्त यांचे दिनांक १९/९/२०२४ रोजीच्या मान्यतेने)

**प्रति,**
आस्थापना अधिक्षक व सर्व वेतन लिपीक, म.न.पा. जळगांव.

**प्रत माहितीस्व सादर :-**
१. मा. आयुक्त, म.न.पा. जळगांव.
२. मा. मुख्य लेखा परिक्षक, म.न.पा. जळगांव.
३. मा. अतिरिक्त आयुक्त, म.न.पा. जळगांव.

D:\F Drive Backup\NEW COMPUTER\EST ALL DOC\NIVAD SAMITI\KALBADH / 25877/23-09-2024

Scanned with CamScanner

जा.क्र./आस्था/2050 /२०२४
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव
दिनांक24 / 09 /२०२४

# कार्यालयीन आदेश

मा. आयुक्त सो., यांनी म.न.पा. आस्थापना सूचीवरील कर्मचाऱ्यांना त्यांची शैक्षणिक पात्रता, गोपनिय अहवाल, जात पडताळणी इ. बाबींचा विचार करुन पात्र कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांवर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेकरीता कर्मचारी पदोन्नती निवड समिती गठित केलेली आहे. त्याअनुषंगाने सदर प्रस्तावांची गठित समितीने शासनाचे वेळोवेळी निर्गमीत झालेले शासन निर्णय, परिपत्रके या सर्व बाबींबाबत सविस्तर तपासणी करुन प्रकरणांबाबत अहवाल सादर करणेकामी दिनांक २६/०९/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता म.न.पा. प्रशासकीय इमारतीमधील मजला क्रमांक १३ वरील आयुक्त यांच्या दालनांत बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी सदर बैठकीत आपण वेळेवर उपस्थित रहावे.

( ज्ञानेश्वर ढेरे )
**आयुक्त तथा प्रशासक**
जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**प्रति,**

१. मुख्य लेखा परिक्षक, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.

२. उपायुक्त (सा.प्र.), जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.

३. अतिरिक्त आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव.

D:\F Drive Backup\NEW COMPUTER\EST ALL DOC\NIVAD SAMITI\KALBADH/25821/12-09-2024/20-09-2024

**प्रतिलिपी :-**

१) आस्थापना अधिक्षक

Scanned with CamScanner

# कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणेकामी दिनांक २६/०९/२०२४ रोजी पदोन्नती निवड समितीच्या झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापना सुचिवरील विचारक्षेत्रातील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०१/२०२४ च्या अंतिम सेवाजेष्ठतेनुसार (दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक ३१/१२/२०२३ या कालावधीतील) कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाचा लाभ देणेकामी दिनांक २६/०९/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता मा. आयुक्त यांच्या कक्षामध्ये बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस खालील सदस्य / अधिकारी उपस्थित होते.

१) आयुक्त तथा अध्यक्ष

२) मुख्य लेखा परिक्षक तथा सदस्य

३) उपायुक्त (सा.प्र.) - आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेला सदस्य

४) अतिरिक्त आयुक्त - आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेला अतिरिक्त सदस्य

५) आस्थापना अधिक्षक तथा विभाग प्रमुख (सदस्य सचिव)

दिनांक २६/०९/२०२४ रोजी दुपारी ठिक १.०० वाजता बैठक सुरु झाली. सदर बैठकीत आस्थापना अधिक्षक तथा विभाग प्रमुख (सदस्य सचिव) यांनी कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या प्रमुख तरतूदींचे शासन निर्णय मार्गदर्शक तरतूदींचे वाचन केले.

कालबध्द पदोन्नती योजना / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / सातवा वेतन आयोगानुसार तीन लाभाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लाभ अनुज्ञेय होणेसाठी शासन निर्णय, आदेश, परिपत्रकांन्वये खालीलप्रमाणे तरतूदी आहेत.

**अ )** सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.एसआरव्ही/१०९५/प्र.क्र.१/९५/बारा,मंत्रालय,मुंबई दि.०८ जुन १९९५ अन्वये गट क व गट ड मधील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासाठी **दि.०१ ऑक्टोंबर १९९४** पासून **कालबध्द पदोन्नती योजना** लागू करणेत आलेली आहे.

या योजनेनुसार;

१. गट क व गट ड मधील पद धारकांना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्यात येईल.

२. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती साखळीतील पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नाही , अशा कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणीतील पुढील वेतनश्रेणी देणेत येईल ( शासन निर्णयाच्या परिशिष्टात नमूद केले नुसार)

३. या योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीसाठी विहीत कार्यपध्दती, सेवाजेष्ठता, पात्रता अर्हता, विभागीय परिक्षा इ.बाबीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

४. संपूर्ण सेवाकाळात १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ श्रेणी केवळ एक वेळ अनुज्ञेय असेल.

५. ज्या कर्मचाऱ्यांना यापूर्वी दोन पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना या योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणार नाही.

६. गट-ड मधील कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी दिली तरी त्यांचे सेवानिवृत्ती वय ६० वर्ष हेच असेल मात्र गट-क मध्ये पदोन्नती पदावर पदोन्नती मिळाल्यास सेवानिवृत्ती वय ५८ वर्ष असेल.

**ब )** वित्त विभाग,शा.नि.क्र.वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३ मंत्रालय,मुंबई,४०००३२ दि.२० जुलै २००१ अन्वये **०१ ऑक्टोबर १९९४** पासून लागू असलेली **कालबध्द पदोन्नती योजना** बंद करणेत येवून त्याऐवजी **दि.०१ ऑगस्ट २००१** पासून **सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना** सुरु करणेत आलेली आहे.

या योजनेनुसार;

१. ८०००-२७५-१३५०० व त्याहून कमी वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना ही योजना लागू होईल.

२. संबंधित पदावरील १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतरच लाभ अनुज्ञेय होईल.

३. सेवेत दोन किंवा त्याहून अधिक पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

४. योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय होईल. पदोन्नतीचे पद उपलब्ध नसलेल्या एकाकी पदांना शासन निर्णयाच्या परिशिष्ट-१ मधील वेतनश्रेणी देय होईल.

५. योजनेअंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय असल्याने वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता,पात्रता,जेष्ठता,अर्हता परिक्षा,विभागीय परिक्षा,इ.बाबीची पूर्तता व पदोन्नतीची कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक राहील. एकाकी पदासाठी गोपनीय अहवालाच्या आधारे पात्रता तपासण्यात येईल.

६. या योजनेचा लाभ संपूर्ण सेवेत फक्त एक वेळ अनुज्ञेय राहील. ज्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजनेअंतर्गत लाभ मिळालेला आहे, त्यांना पुन्हा वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ अनुज्ञेय होणार नाही.

७. वरिष्ठ वेतनश्रेणी दिल्यावर वेतन निश्चिती नियमित पदोन्नती प्रमाणेच होईल. त्याच वेतनश्रेणीत नियमित / कार्यात्मक पदोन्नती (प्रत्यक्ष पदोन्नती) मिळाल्यावर पुन्हा वेतन निश्चिती लाभ मिळाणार नाही.

८. नियमित पदोन्नती,नाकारलेल्या तसेच पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ देय होणार नाही.

**क )** वित्त विभाग, शा.नि.क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/सेवा-३ मंत्रालय,मुंबई-४०००३२ दि.०१ एप्रिल २०१० अन्वये **दि.०१ ऑगस्ट २००१** पासून सुरु असलेली **सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना** ही **दि.०१ ऑक्टोबर २००६** पासून **सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना** या नावाने सुधारित स्वरुपात लागू करणेत आलेली आहे.

या योजनेनुसार;



Scanned with CamScanner

१. ही योजना रु.१५६००-३९००+५४०० पर्यंत ग्रेड वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू राहील.
२. संपूर्ण सेवा कालावधीत कमाल दोन वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना मंजूर करण्यात येईल.
३. तीन किंवा त्यापेक्षा जास्त पदोन्नत्या मिळालेल्या कर्मचाऱ्यांना लागू नाही.
४. दोन पदोन्नत्या मिळालेल्या कर्मचाऱ्यास एक लाभ मिळेल.
५. एक पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यास दोन लाभ मिळतील.
६. १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर पहिला लाभ,पहिला लाभ मिळाल्यांनतर १२ वर्षांनी म्हणजेच एकुण २४ वर्षांनी दुसरा लाभ मिळेल.
७. कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत मिळालेला लाभ पहिला लाभ समजला जाईल.
८. दर्जोन्नती झालेली असल्यास तो पहिला लाभ समजला जाईल.
(उदा.कनिष्ठ अभियंता- चार वर्षानंतर श्रेणीवाढ- शाखा अभियंता)
९. एक किंवा दोन पदोन्नती नंतर पदोन्नतीचे पद उपलब्ध नसेल तर एकाकी पदाच्या कार्यपध्दतीनुसार लाभ देय होईल.
१०. लाभ दिल्यानंतर प्रत्यक्ष त्या पदावर पदोन्नती झाल्यास पुन्हा वेतन निश्चितीचा लाभ मिळणार नाही.
११. ज्या पदाची वेतन संरचना मंजूर करण्यात येणार आहे, ज्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळण्यासाठी विहीत केलेल्या अटी-शर्तीची पूर्तता झाले नंतरच लाभ अनुज्ञेय होईल. तसेच पदोन्नतीसाठी विहीत केलेली गोपनीय अहवालाची किमान सरासरी प्रतवारी प्राप्त करणे आवश्यक राहील,त्याशिवाय लाभ देय होणार नाही.
१२. पहिल्या लाभानंतर त्या पदावरील पदोन्नतीसाठी अपात्र ठरला किंवा पदोन्नती नाकारली तर लाभ काढून घेतला जाईल, तसेच दुसऱ्या लाभासाठी विचार केला जाणार नाही. पदोन्नती स्विकारल्यानंतर १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर दुसरा लाभ मंजूर केला जाईल.
१३. पहिला / दुसरा लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारली किंवा अपात्र ठरला तर देणेत आलेले लाभ काढून घेणेत येतील.
१४. लाभ काढून घेतल्यानंतर लाभ दिलेले नव्हते असे समजून फेर वेतन निश्चिती केली जाईल.
१५. सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजनेसाठी जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे (शा.नि.क्र.वित्त विभाग वेतन ११११/प्र.क्र.८/ सेवा-३ दि.०१/०७/२०११)
१६. या योजनेखाली पहिला / दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेणेत येतील, मात्र दिलेल्या लाभाची वसूली करण्यात येणार नाही (शा.नि.क्र.वित्त विभाग आप्रयो-१०१५ / प्र.क्र.१११/ २०१५/सेवा-३ दि. २३ डिसेंबर २०१५) (एकाकी पदासाठी- आ.प्र.यो.१०१५/प्र.क्र.१११/२०१५ सेवा-३ दि.२३/१२/२०१५)

ड) वित्त विभाग शा.नि.क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०११ सेवा-३ **दि.०२ मार्च २०१९** अन्वये **तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि.०१/०१/२०१६** पासून लागू करणेत आलेली आहे.
या योजनेनुसार;
१. १०,२०,३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर संपूर्ण सेवा काळात एकूण तीन लाभ देय होतील.
२. एस-२० वेतनस्तर पर्यंत वेतन घेणाऱ्या कर्मचारी-अधिकारी यांना लागू राहील. एस-२१ मध्ये गेल्यास लाभ मिळणार नाही.
३. दोन पदोन्नत्या मिळाल्या असतील तर एक लाभ अनुज्ञेय होईल.
४. तीन पदोन्नत्या मिळाल्या असतील लाभ अनुज्ञेय नाही.
या योजनेच्या लाभासाठी पदोन्नतीच्या पदाची विहीत अर्हता,जेष्ठता,पात्रता,अर्हता परिक्षा,विभागीय परिक्षा,गोपनीय अहवलाची प्रतवारी विभागीय चौकशी,न्यायिक प्रकरण प्रलंबित नसणे, यथास्थिती जात वैधता प्रमाणपत्र इ.पदोन्नतीच्या कार्यपध्दतीची पूर्तता असणे आवश्यक आहे.
५. कालबध्द पदोन्नती,सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना,सुधारित आश्वासित प्रगती योजना या अंतर्गत पहिला,दुसरा लाभ घेतला असेल ते या योजनेअंतर्गत पहिला व दुसरा लाभ असल्याचे समजण्यात येईल.
६. दर्जोन्नतीचा लाभ प्रकरणपरत्वे पहिला / दुसरा लाभ समजण्यात येईल.
७. दि.०१/०१/२०१६ पूर्वी पहिला लाभ मिळाला असेल तर दुसरा लाभ (१२+८) २० वर्षानंतर व तिसरा लाभ दुसऱ्या लाभापासून (२०+१०) १० वर्षानंतर आणि दि.०१/०१/२०१६ पूर्वी दुसरा लाभ मिळाला असेल तर तिसरा लाभ दुसऱ्या लाभापासून (२४+६) सहा वर्षानंतर मिळेल.
८. प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या किंवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देणेत आलेले लाभ काढून घेणेत येतील, तथापि वसुली केली जाणार नाही व लाभापूर्वीच्या स्थितीनुसार वेतन निश्चिती करण्यात येईल.
९. रोजंदारी,कंत्राटी,तदर्थ नियुक्त कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही.

या सर्व योजनांचा लाभ अनुज्ञेय होणेसाठी पदोन्नतीच्या पदाची पात्रता असणे आवश्यक तसेच बंधनकारक आहे, सबब पदोन्नतीसाठीची अर्हता,पात्रता,जेष्ठता,विभागीय परिक्षा इ.सर्व अटी व पदोन्नतीची कार्यपध्दती ही वेळोवेळी शासन निर्णयानुसार निश्चित केलेली आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.एस.आर.व्ही.२०१८/ प्र.क्र.१५९/ कार्यासन-१२ दि.०१ ऑगस्ट २०१९ अन्वये पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाही बाबतची एकत्रित मार्गदर्शन तत्त्वे विहीत करणेत आलेली आहेत. या मार्गदर्शक तत्वानुसारच कालबध्द पदोन्नती योजना / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अंतर्गत देय लाभासाठीची पात्रता तपासण्यात येत असते, सबब सदर लाभ अनुज्ञेय होणेसाठी पात्रता या मार्गदर्शक तत्वानुसार तपासणे आवश्यक आहे व त्यादृष्टीने आवश्यक त्या बाबींची पूर्तता करणे क्रमप्राप्त आहे. त्याकामी सर्व संबंधित अधिकारी-कर्मचारी यांना सदर मार्गदर्शकतत्त्वांचे तरतूदींचे अवलोकन करणेबाबत परिपत्रक क्र./ जमपा/ १३२८/ २०२४ दिनांक २५/०७/२०२४ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

Scanned with CamScanner

तसेच जा.क्र./आस्था/१९२४/२०२३ दिनांक २०/१०/२०२३, परिपत्रक क्र./जमपा/आस्था/२७३७/ २०२३ दिनांक २८/१२/२०२३ व जा.क्र./आस्था/४०७/२०२४-२५ दिनांक ०९/०५/२०२४ अन्वये दिनांक ३१/१२/२०२३ अखेर कार्यरत असलेल्या जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापना सुचिवरील कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती / सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाचा लाभ देणेकामी पात्र कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही पूर्ण करणेबाबत संबंधित कार्यासन लिपिकांना सूचित करणेत आलेले आहे. त्यानुसार विचारक्षेत्रातील कर्मचारी यांचे सेवा पुस्तक व वैयक्तिक सेवा तपशीलाच्या प्राप्त माहिती वरुन प्रपत्र अ व ब तसेच छाननी तक्ता प्रपत्र क भरुन संवर्ग निहाय कालबद्ध पदोन्नती, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत विवरणपत्र - १ मध्ये विचार क्षेत्रातील (दिनांक ०१ जानेवारी २०२४ चे अंतिम सेवाजेष्ठता यादीनुसार - दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक ३१/१२/२०२३ या कालावधीत कार्यरत कर्मचारी ) कर्मचाऱ्यांना प्रस्तुत योजने अंतर्गत लाभ देणेकामी खालील प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

## आस्थापना विभागाचा प्रस्ताव

**प्रस्ताव क्रमांक १**

विवरणपत्र – १ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना विचार क्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी यांचा तपशील दर्शविणारी एकत्रित यादी (संवर्ग निहाय जेष्ठतेनुसार)

विवरणपत्र - १-अ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना विचार क्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी (प्रथम लाभ)

विवरणपत्र - १-ब सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना विचार क्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी (व्दितीय लाभ)

विवरणपत्र - १-क सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना विचार क्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी (तृतीय लाभ)

**प्रस्ताव क्रमांक २**

दिनांक ०१/१०/२००६ ते दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंतच्या कालावधीत सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे, अशा दोन्ही प्रकारच्या कर्मचारी / अधिकारी यांची दिनांक ०१ जानेवारी २०१६ रोजीची वेतन निश्चिती ही (१) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन -२०१९/ प्र.क्र.२३/सेवा-३ दिनांक ०१/०३/२०१९ (२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक - वेतन १११९/ प्र.क्र.०३/२०१९/सेवा-३ दिनांक ०२/०३/२०१९ (३) वित्त विभाग शासन शुद्धीपत्रक क्र. वेतन १११९/ प्र.क्र.०३/ २०१९/सेवा-३ दिनांक ०७/१०/२०२२ मधील तरतूदीनुसार करणेत येईल. तसेच ज्या कर्मचाऱ्यांनी पैतृक रक्तसंबंधातील नातेवाईकांचे जात वैधता प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र व जात वैधता पडताळणी समितीकडे जात वैधता पडताळणी प्रस्ताव सादर केलेला आहे, अशा कर्मचाऱ्यांना त्यांचे स्वत:चे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेनंतरच वेतननिश्चिती करणेचे आदेश निर्गमित करणेत येतील, स्वत:चे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले शिवाय वेतन निश्चिती करणेत येणार नाही, असा प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ३**

सन १९९७ पूर्वी नाकेदार असलेल्या कर्मचाऱ्यांना सन १९९७-९८ मध्ये लिपिक पदी पदोन्नती दिलेली आहे. तथापि तद्नंतर लागू झालेल्या पाचव्या वेतन आयोगात (१ जानेवारी १९९६ पासून) नाकेदार हा संवर्ग व्यपगत करुन नाकेदार पद लिपिक समकक्ष असल्याने लिपिक संवर्गात विलीन केलेला असल्याने व आज रोजी नाकेदार हा स्वतंत्र संवर्ग नसल्याने व नाकेदार लिपिक यांची वेतनश्रेणी समकक्ष एकच असल्याने नाकेदार ते लिपिक ही पदोन्नती न समजता दर्जोन्नती समजून सदर पदोन्नती एकच पदोन्नती समजून आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ देणेत यावा. अशी विनंती केलेली आहे, त्याचा सकारात्मक विचार करणेत यावा. असा प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

## वरील प्रस्तावांबाबत कर्मचारी पदोन्नती समितीचा निर्णय

तरी सदर प्रस्ताव विभागीय पदोन्नती समिती समोर उचित निर्णयार्थ सादर करणेत आले. त्यानुसार उक्त प्रस्तावावर खालील अटी शर्तीस अधिन राहून खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आले. त्यानुसार समितीच्या निर्णयाचे अनुषंगाने कर्मचाऱ्यांच्या नावासमोर नमुद केलेनुसार त्या-त्या वेतनश्रेणीत वेतननिश्चिती व वेतनश्रेणी लागू करणेबाबतचे प्रस्ताव विहीत कार्यपद्धतीने स्वतंत्ररित्या सादर करावेत व त्यास आयुक्त यांची मान्यता प्राप्त झालेनंतर प्रत्यक्षात देय वेतनश्रेणीत वेतन व वेतन फरक अदा करणेत येईल.

**प्रस्ताव क्रमांक १**

विवरणपत्र - २-अ सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कर्मचारी पदोन्नती समितीचा निर्णय (प्रथम लाभ)

विवरणपत्र - २-ब सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कर्मचारी पदोन्नती समितीचा निर्णय (व्दितीय लाभ)

विवरणपत्र - २-क सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना कर्मचारी पदोन्नती समितीचा निर्णय (तृतीय लाभ)

विवरणपत्र - ३ देय लाभाचा संवर्गनिहाय एकत्रित गोषवारा ( संगर्वनिहाय सेवाजेष्ठता यादीनुसार)

**प्रस्ताव क्रमांक २**

दिनांक ०१/१०/२००६ ते दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंतच्या कालावधीत सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे, अशा दोन्ही प्रकारच्या कर्मचारी / अधिकारी यांची दिनांक ०१ जानेवारी २०१६ रोजीची वेतन निश्चिती ही (१) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक वेतन -२०१९/ प्र.क्र.२३/सेवा-३ दिनांक ०१/०३/२०१९ (२) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक - वेतन १११९/ प्र.क्र.०३/२०१९/सेवा-३ दिनांक ०२/०३/२०१९ (३) वित्त विभाग शासन शुद्धीपत्रक क्र. वेतन १११९/ प्र.क्र.०३/ २०१९/सेवा-३ दिनांक ०७/१०/२०२२ मधील तरतूदीनुसार करणेत येईल. तसेच ज्या कर्मचाऱ्यांनी पैतृक रक्तसंबंधातील नातेवाईकांचे जात वैधता प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र व जात वैधता पडताळणी समितीकडे जात वैधता पडताळणी प्रस्ताव सादर केलेला आहे, अशा कर्मचाऱ्यांना त्यांचे स्वत:चे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेनंतरच वेतननिश्चिती करणेचे आदेश निर्गमित करणेत येतील, स्वत:चे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले शिवाय वेतन निश्चिती करणेत येणार नाही, आस्थापना विभागाच्या या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

**प्रस्ताव क्रमांक ३**

सन १९९७ पूर्वी नाकेदार असलेल्या कर्मचाऱ्यांना सन १९९७-९८ मध्ये लिपिक पदी पदोन्नती दिलेली आहे. तथापि तद्नंतर लागू झालेल्या पाचव्या वेतन आयोगात (१ जानेवारी १९९६ पासून) नाकेदार हा संवर्ग व्यपगत करुन नाकेदार पद लिपिक समकक्ष असल्याने लिपिक संवर्गात विलीन केलेला असल्याने व आज रोजी नाकेदार हा स्वतंत्र संवर्ग नसल्याने व नाकेदार लिपिक यांची वेतनश्रेणी समकक्ष एकच असल्याने नाकेदार ते लिपिक ही पदोन्नती न समजता दर्जोन्नती समजून सदर पदोन्नती एकच पदोन्नती समजून आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ देणेत यावा, अशी विनंती केलेली आहे, त्याचा सकारात्मक विचार करणेत यावा. असा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावात आस्थापना विभागाची शिफारस मान्य करण्यात येत आहे.

**अटी शर्ती :-**

१) कर्मचारी पदोन्नती समितीने सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत आस्थापना विभागाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार यथास्थिती प्रथम, व्दितीय, तृतीय लाभ मंजूर करणेबाबतचा धोरणात्मक निर्णय घेवून त्यास तत्वत: मंजूरी दिलेली आहे. सबब प्रत्यक्ष लाभ / वेतननिश्चिती प्रस्ताव सादर करणेपूर्वी / करतांना वेतन लिपिक, वरिष्ठ लिपिक, आस्थापना अधिक्षक, उपायुक्त (सा.प्र.) यांनी प्रत्येक प्रस्तावाची पुनश्च: पडताळणी करुन अचूक व अनुज्ञेय वेतननिश्चिती नुसारच वेतननिश्चितीचे प्रस्ताव (अनुज्ञेय वेतनश्रेणी, लाभाचा देय दिनांक, पदाची शैक्षणिक अर्हता, तांत्रिक अर्हता, विहीत सेवा कालावधी इ. बाबी तपासून शैक्षणिक व तांत्रिक अर्हतेच्या वैधतेची तसेच सर्व अटी-शर्तीची पूर्तता होते किंवा नाही याची पुनश्च खात्री करावी. व खात्री करुनच सादर करावेत व तद्नंतर अचूक व अनुज्ञेय वेतननिश्चितीचे विहीत त्या सर्व अटी शर्ती नमूद करुन सक्षम प्राधिकारी यांचे मान्यतेनंतर आदेश पारित करावेत. चुकीची वेतनश्रेणी, लाभाचा चुकीचा, दिनांक दिला जाणार नाही याची खात्री करावी व तशी गांभीर्यपूर्वक दक्षता घ्यावी. चुकीची वेतननिश्चिती, चुकीचा लाभ दिल्यास त्याची व्यक्तिश: व सर्वस्वी जबाबदारी संबंधित वेतन लिपिकावर निश्चित करणेत येईल याची प्रकर्षाने व गांर्भीयाने नोंद घ्यावी. कर्मचारी पदोन्नती समितीच्या निर्णयानुसार वेतननिश्चिती करणेकामी अनावश्यक विलंब,दिरंगाई, हलगर्जीपणा,टाळाटाळ होणार नाही याची जाणीवपूर्वक दक्षता घ्यावी. अनावश्यक विलंब केल्यास जबाबदारी निश्चित करण्यात येवून संबंधीत वेतन लिपीकावर शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल याची गांर्भीयाने नोंद घ्यावी.

२) तसेच (१) संवर्ग – वर्ग चार - उच्चश्रेणी (गट-ड) पदनाम मोकादम,जमादार, चौकीदार, मलेरिया मोकादम (२) वाहन चालक (३) शिपाई (४) लिपिक संवर्ग गट चतुर्थ श्रेणी व तत्सम (५) सफाई कामगार या संवर्गातील कर्मचाऱ्यांचा सेवा कालावधी पाहता यातील काही कर्मचाऱ्यांचा व्दितीय व तृतीय लाभासाठी अनुज्ञेय असणारा सेवा कालावधी झालेला असतांना उक्त नमूद संवर्गातील काही कर्मचाऱ्यांचा व्दितीय व तृतीय लाभाच्या विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या यादीत समावेश करणेत आलेला नाही. सदर कर्मचाऱ्यांचा समावेश का सादर करणेत आलेला नाही याचा संबंधित वेतन लिपिकांकडून खुलासा मागविणेत यावा आणि समर्पक खुलासा नसल्यास त्यांचे विरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करणेत यावी. तसेच समावेश नसलेल्या कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव तयार करुन तो आगामी कर्मचारी पदोन्नती समितीच्या बैठकीत यथाशिघ्र सादर करणेत यावा.

उपोद्घातात नमूद शासन निर्णय, तरतूदी, मार्गदर्शक तत्वे व आस्थापना विभागाने सादर केलेला प्रस्ताव व त्यावर चर्चाविनिमय होवून उक्त परिच्छेदांमध्ये नमूद केलेले निर्देश अटी-शर्ती इ.बाबत सर्वकष चर्चा होवून कर्मचारी पदोन्नती सोबतच्या विवरणपत्र २-अ,२-ब, २-क, विवरणपत्र ३ मध्ये नमूद केलेनुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा यथास्थिती प्रथम, व्दितीय व तृतीय लाभ याव्दारे मंजूर करणेत येत आहे.

**आस्थापना अधिक्षक तथा विभाग प्रमुख (सदस्य सचिव)**
कर्मचारी पदोन्नती समिती
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**उपायुक्त (सा.प्र.) तथा सदस्य**
कर्मचारी पदोन्नती समिती
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**मुख्य लेखा परिक्षक तथा सदस्य**
कर्मचारी पदोन्नती समिती
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**अतिरिक्त आयुक्त तथा सदस्य**
कर्मचारी पदोन्नती समिती
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**आयुक्त तथा अध्यक्ष**
कर्मचारी पदोन्नती समिती
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

Scanned with CamScanner

JALGAON CITY MUNICIPAL CORPORATION • JALGAON • जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना

## गोषवारा

| अ.क्र. | संवर्ग | गट | संवर्गा मधील एकुण कर्मचारी संख्या | प्रथम लाभ | | | | | | | द्वितीय लाभ | | | | | | | तृतीय लाभ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विचार क्षेत्रातील एकुण | पात्र ४-अ | अपात्र ५-अ | प्रकरण खुले ६-अ | सेवा कालावधी अपुर्ण ७-अ | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या ८-अ | एकुण | विचार क्षेत्रातील एकुण | पात्र ४-ब | अपात्र ५-ब | प्रकरण खुले ६-ब | सेवा कालावधी अपुर्ण ७-ब | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या ८-ब | एकुण | विचार क्षेत्रातील एकुण | पात्र ४-क | अपात्र ५-क | प्रकरण खुले ६-क | सेवा कालावधी अपुर्ण ७-क | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या ८-क | एकुण |
| | **सामान्य प्रशासन** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | वरिष्ठ लिपीक, कर निरीक्षक, अभिलेखापाल,क.अंतरलेखा परिक्षक,वरिष्ठ जकात निरीक्षक,जकात तपासणीस ,अतिक्रमण निरीक्षक | क | ३ | ३ | ० | १ | २ | ० | ० | ३ | २ | ० | ० | २ | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | लिपीक, मिटर रिडर,सहा.ग्रथपाल,सहा.भांडारपाल/स्टोअर किपर, रोखपाल,बाजार इन्स्पेक्टर, जकात निरीक्षक ,जकात तपासणीस/लिपीक, पौंडकिपर,टंकलेखक, बिल लिपीक, बालवाडी पर्यवेक्षक, मध्यवर्ती गोडावुन लिपीक | क | ११५ | ९५ | ३६ | ३५ | २१ | ३ | ० | ९५ | २० | ३ | १४ | ३ | ० | ० | २० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **बांधकाम विभाग** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | सहाय्यक अभियंता, उपअभियंता | क | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | क | ७ | ५ | १ | १ | ३ | ० | ० | ५ | २ | २ | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | आवेक्षक | क | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | मिक्चर मशिन चालक | क | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | कारपेंटर | क | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | वर्कमिस्त्री, गवंडी, मिस्तरी | क | ६ | ६ | ० | ० | ६ | ० | ० | ६ | ४ | ० | २ | २ | ० | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **नगर रचना विभाग** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | रचना सहाय्यक | क | २ | २ | ० | २ | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० | बिल्डींग इन्स्पेक्टर | क | ७ | ३ | ० | ३ | ० | ० | ० | ३ | ४ | ० | ४ | ० | ० | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ११ | आरेखक (ड्राफ्ट्समन) | क | १ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १२ | सर्व्हेअर, उपआवेक्षक | क | ४ | ४ | ४ | ० | ० | ० | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १३ | ट्रेसर (अनुरेखक) | क | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **विद्युत विभाग** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १४ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | क | ४ | ४ | १ | ० | ३ | ० | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १५ | लाईट इन्स्पेक्टर,असि.लाईट इन्स्पेक्टर,वायरमन | क | २४ | २३ | ७ | १४ | १ | १ | ० | २३ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

E:\WINDOW 10 D.S\EST\कालबद्ध पदोन्नती बाबत\कालबद्ध उन्नती तक्ते सेवा जेष्ठतेनुसार\अंतिम सेट नं.3\कव्हरपेज साठी 4-10-2024

JALGAON CITY MUNICIPAL CORPORATION
जळगांव शहर महानगरपालिका जळगांव

| अ.क्र. | संवर्ग | गट | संवर्गा मधील एकुण कर्मचारी संख्या | प्रथम लाभ | | | | | | | द्वितीय लाभ | | | | | | | तृतीय लाभ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विचार क्षेत्रातील एकूण | पात्र | अपात्र | प्रकरण खुले | सेवा कालावधी अपुर्ण | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या | एकूण | विचार क्षेत्रातील एकूण | पात्र | अपात्र | प्रकरण खुले | सेवा कालावधी अपुर्ण | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या | एकूण | विचार क्षेत्रातील एकूण | पात्र | अपात्र | प्रकरण खुले | सेवा कालावधी अपुर्ण | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या | एकूण |
| | | | | | ४-अ | ५-अ | ६-अ | ७-अ | ८-अ | | | ४-ब | ५-ब | ६-ब | ७-ब | ८-ब | | | ४-क | ५-क | ६-क | ७-क | ८-क | |
| | **पाणी पुरवठा विभाग** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १६ | फिल्टर इंचार्ज | क | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १७ | इन्स्टयुमेंट मेकॅनिक | क | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १८ | शिफ्ट इंचार्ज,इलेक्ट्रिशियन | क | ५ | ४ | ० | ० | ४ | ० | ० | ४ | २ | ० | ० | २ | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १९ | फिटर, प्लंबर | क | २३ | २२ | १ | ० | २१ | ० | ० | २२ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २० | फिल्टर ऑपरेटर | क | २ | २ | ० | ० | २ | ० | ० | २ | २ | ० | २ | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २१ | फिल्टर अटेंडट | क | २ | २ | ० | १ | १ | ० | ० | २ | २ | ० | २ | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २२ | पंप ऑपरेटर | क | ६ | ६ | ३ | ० | ३ | ० | ० | ६ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २३ | क्लोरीन ऑपरेटर | क | ३ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | २ | ० | ० | २ | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **वाहन विभाग** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २४ | मेकॅनिक | क | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २५ | ऑटो मेकॅनिक | क | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **दवाखाने विभाग** | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २६ | प्रमुख वैद्यकिय अधिकारी | क | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २७ | वैद्यकिय अधिकारी | क | २ | २ | २ | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २८ | प्रमुख परिचारीका | क | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २९ | परिचारीका | क | १६ | १२ | ११ | ० | ० | १ | ० | १२ | ४ | ४ | ० | ० | ० | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३० | औषध निर्माता | क | ६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ६ | ६ | ० | ० | ० | ० | ६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३१ | एक्सरे टेक्निशिअन | क | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
CITY MUNICIPAL CORPORATION JALGAON

| अ.क्र. | संवर्ग | गट | संवर्गा मधील एकुण कर्मचारी संख्या | प्रथम लाभ | | | | | | | द्वितीय लाभ | | | | | | | तृतीय लाभ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विचार क्षेत्रातील एकूण | पात्र | अपात्र | प्रकरण खुले | सेवा कालावधी अपुर्ण | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या | एकूण | विचार क्षेत्रातील एकूण | पात्र | अपात्र | प्रकरण खुले | सेवा कालावधी अपुर्ण | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या | एकूण | विचार क्षेत्रातील एकूण | पात्र | अपात्र | प्रकरण खुले | सेवा कालावधी अपुर्ण | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या | एकूण |
| | | | | | ४-अ | ५-अ | ६-अ | ७-अ | ८-अ | | | ४-ब | ५-ब | ६-ब | ७-ब | ८-ब | | | ४-क | ५-क | ६-क | ७-क | ८-क | |
| ३२ | लॅब टेक्नीशीयन | क | ४ | २ | २ | ० | ० | ० | ० | २ | ३ | २ | १ | ० | ० | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३३ | मिड वाईफ (प्रमुख आया-दाया) | क | २ | २ | २ | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३४ | वैद्यकिय अधिकारी (कुटुंब नियोजन व माता बालसंगोपन कडील) | क | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३५ | आरोग्य सेवक | क | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | आरोग्य विभाग | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३६ | आरोग्याधिकारी | क | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३७ | आरोग्य निरीक्षक | क | २ | २ | १ | ० | ० | ० | १ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३८ | कांझरवंशी इन्सपेक्टर | क | २ | २ | १ | ० | १ | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | नागरी हिवताप विभाग | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३९ | किटक संहारक | क | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अग्निशमन विभाग | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४० | फायरमन | क | ३ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | २ | १ | १ | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४१ | सहा फायरमन | क | ३ | ३ | ० | ३ | ० | ० | ० | ३ | ३ | ० | ३ | ० | ० | ० | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | ग्रंथालय विभाग | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४२ | ग्रंथपाल | क | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४३ | टेलीफोन अटेंडंट/टेलिफोन ऑपरेटर | क | ४ | ४ | १ | २ | १ | ० | ० | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४४ | वाहन चालक | क | ५५ | ४४ | १६ | २ | २५ | ० | १ | ४४ | ११ | ४ | १ | ६ | ० | ० | ११ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४६ | मोकादम,जमादार,चौकीदार,मलेरिया मोकादम,हेड माळी | ड | २८ | २३ | ९ | १ | ८ | ५ | ० | २३ | ५ | ३ | ० | २ | ० | ० | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

| अ.क्र. | संवर्ग | गट | संवर्गा मधील एकुण कर्मचारी संख्या | प्रथम लाभ | | | | | | | द्वितीय लाभ | | | | | | | तृतीय लाभ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | विचार क्षेत्रातील एकूण | पात्र | अपात्र | प्रकरण खुले | सेवा कालावधी अपुर्ण | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या | एकूण | विचार क्षेत्रातील एकूण | पात्र | अपात्र | प्रकरण खुले | सेवा कालावधी अपुर्ण | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या | एकूण | विचार क्षेत्रातील एकूण | पात्र | अपात्र | प्रकरण खुले | सेवा कालावधी अपुर्ण | वेतन लिपीक यांनी प्रस्ताव सादर न केलेली संख्या | एकूण |
| | | | | | ४-अ | ५-अ | ६-अ | ७-अ | ८-अ | | | ४-ब | ५-ब | ६-ब | ७-ब | ८-ब | | | ४-क | ५-क | ६-क | ७-क | ८-क | |
| ४६ | शिपाई | ड | १०९ | ३९ | १४ | १३ | ७ | ५ | ० | ३९ | ६९ | ५६ | ० | १३ | ० | ० | ६९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४७ | वॉचमन,शाळा वॉचमन,रखवालदार, मलेरिया कुली ,पिंजरा कुली,तेल कुली,कुली,कोंडवाला कुली, ब.माळी/माळी,चौकीदार/व्हॉलमन पा.पु., राखिव चौकीदार,व्हॉलमन पा.पु.,स्मशानभुमी रक्षक,झाडे सरंक्षक, क्लिनर, मोटार स्वच्छक, लाईफ गार्ड, हेल्पर/मजुर, दिवा बत्ती नोकर,शेती नोकर,वॉटर सप्ला.नोकर,ऑइलमन,लाईन मन,फेरो प्रिंटर, धर्मशाळा अटेडंट,वार्डबॉय, महिला कर्मचारी. | ड | ४६८ | २६९ | ६१ | १०३ | ३४ | ७० | १ | २६९ | १९९ | ११२ | ४ | ८३ | ० | ० | १९९ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४८ | सफाई कामगार | ड | ५७२ | ५५८ | ३० | २५२ | १६२ | ११४ | ० | ५५८ | १४ | ४ | १ | ९ | ० | ० | १४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४९ | लॅब असिस्टंट | ड | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ | ० | ० | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५० | पंप अटेंन्डट | ड | १७ | १७ | ९ | ५ | [illegible] | ० | ० | १७ | १६ | ६ | ५ | ५ | ० | ० | १६ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५१ | ड्रेसर | ड | ५ | २ | १ | १ | ० | ० | ० | २ | ५ | २ | ३ | ० | ० | ० | ५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५२ | आया दाया | ड | १६ | १६ | १ | ५ | १० | ० | ० | १६ | १४ | १ | ३ | १० | ० | ० | १४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५३ | लॅब अटेंडन्ट | ड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५४ | एक्सरे अटेंडन्ट (अधिसंख पद) | ड | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५५ | अप्रशिक्षित फायरमन | ड | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | गट-क | | ३३१ | २७३ | ९५ | ६८ | १०० | ७ | ३ | २७३ | ७८ | २७ | ३२ | १९ | ० | ० | ७८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | गट-ड | | १२२० | ९२५ | १२६ | ३८० | २२४ | १९४ | १ | ९२५ | ३२७ | १८८ | १६ | १२३ | ० | ० | ३२७ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | | १५५१ | ११९८ | २२१ | ४४८ | ३२४ | २०१ | ४ | ११९८ | ४०५ | २१५ | ४८ | १४२ | ० | ० | ४०५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |

जा.क्र./आस्था/ २४० /२०२५
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव
दिनांक २५/०४/२०२५

## कार्यालयीन आदेश

**संदर्भ :-** दिनांक २६/०९/२०२४ रोजी पदोन्नती निवड समितीच्या झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

ज्या अर्थी जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापना सुचिवरील विचारक्षेत्रातील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०१/२०२४ च्या अंतिम सेवाजेष्ठतेनुसार (दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक ३१/१२/२०२३ या कालावधीतील) कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणेकामी दिनांक २६/०९/२०२४ रोजी पदोन्नती निवड समितीच्या झालेल्या बैठकीचे इतिवृत्तचे अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

१ ) दिनांक २६/०९/२०२४ रोजीच्या कर्मचारी पदोन्नती समितीच्या निर्णयानुसार आस्थापना विभागाने सादर केलेल्या प्रस्तावातील यथास्थिती प्रथम, व्दितीय, तृतीय लाभ मंजूर करणेबाबत विवरणपत्र २-अ,२-ब, २-क व विवरणपत्र ३ मध्ये नमूद केलेल्या पात्र कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा यथास्थिती प्रथम, व्दितीय व तृतीय लाभ याव्दारे मंजूर करणेत येत आहे.

त्यानुसार उक्त विवरणपत्रातील समितीच्या निर्णयाचे अनुषंगाने पात्र कर्मचाऱ्यांच्या नावासमोर नमुद वेतनश्रेणीत वेतननिश्चिती व वेतनश्रेणी लागू करणेबाबतचे कर्मचारी निहाय स्वतंत्ररित्या प्रस्ताव सादर करावेत व त्यास आयुक्त यांची मान्यता प्राप्त झालेनंतर प्रत्यक्षात देय वेतनश्रेणीत वेतन व वेतन फरक अदा करावा.

२ ) दिनांक २६/०९/२०२४ रोजीच्या कर्मचारी पदोन्नती समितीच्या इतिवृत्तातील प्रस्ताव क्रमांक २ हा कर्मचारी पदोन्नती समितीने मंजूर केलेला आहे. त्यामुळे प्रस्ताव क्रमांक २ मधील संबंधित कर्मचारी यांना वैयक्तिक सेवा तपशिलाची / कागदपत्राची पूर्तता करणेकामी लेखी सूचना द्याव्यात. व त्यानुसार संपूर्ण सेवा तपशिलाची / कागदपत्राची पूर्तता झाल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या नावासमोर नमुद केलेनुसार त्या-त्या वेतनश्रेणीत वेतननिश्चिती व वेतनश्रेणी लागू करणेबाबतचे प्रस्ताव स्वतंत्ररित्या सादर करावेत व त्यास आयुक्त यांची मान्यता प्राप्त झालेनंतर प्रत्यक्षात देय वेतनश्रेणीत वेतन व वेतन फरक अदा करणेत येईल.

३ ) दिनांक २६/०९/२०२४ रोजीच्या कर्मचारी पदोन्नती समितीच्या निर्णयानुसार जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापना सुचिवरील विचारक्षेत्रातील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१/०१/२०२४ च्या अंतिम सेवाजेष्ठतेनुसार (दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक ३१/१२/२०२३ या कालावधीतील) कालबद्ध पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देणेकामी प्रस्ताव क्रमांक ३ ला देखील तत्वत: मंजूरी दिलेली आहे. सबब प्रस्ताव क्रमांक ३ अंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना देखील त्यांचे सेवातपशील व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणेस सूचित करणेत यावे. सदर परिपूर्ण प्रस्ताव आगामी कर्मचारी निवड व पदोन्नती समितीच्या निर्णयार्थ सादर करावेत.

तसेच दिनांक ०१/०१/२०२४ च्या अंतिम सेवाजेष्ठतेनुसार (दिनांक ०१/०१/२०२३ ते दिनांक ३१/१२/२०२३ या कालावधीतील) जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापना सुचिवरील विचारक्षेत्रात समावेश असलेल्या तथापी सेवा तपशिलाची पूर्तता न केल्यामुळे तसेच प्रस्तावातील त्रृटींमुळे लाभ देता आलेला नाही अशा कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव आगामी कर्मचारी पदोन्नती समितीच्या बैठकीत सादर करणेबाबत संबंधित आस्थापना कार्यासन लिपीक यांनी दक्षता घ्यावी.

४ ) दिनांक २६/०९/२०२४ रोजीच्या कर्मचारी पदोन्नती समितीच्या निर्णयानुसार ज्या कर्मचाऱ्यांच्या प्रस्तावाबाबत **प्रकरण खुले** असा निर्णय झालेला आहे असे प्रस्ताव पुन्हा आगामी कर्मचारी निवड व पदोन्नती समिती समोर

Scanned with CamScanner

निर्णयार्थ सादर करावे. तसेच त्यांना देखील त्यांचे सेवातपशील व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणेकामी सूचीत करणेत यावे.

५ ) दिनांक २६/०९/२०२४ रोजीच्या कर्मचारी पदोन्नती समितीच्या निर्णयानुसार वेतननिश्चिती करणेकामी अनावश्यक विलंब,दिरंगाई, हलगर्जीपणा,टाळाटाळ केल्यास जबाबदारी निश्चित करण्यात येवून संबंधीत वेतन लिपीकावर शिस्तभंग विषयक कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

(ज्ञानेश्वर ढेरे)
**आयुक्त**
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**प्रति,**
१) आस्थापना अधिक्षक,म.न.पा. जळगांव.
२) वरिष्ठ लिपीक, आस्थापना विभाग, म.न.पा. जळगांव.
३) सर्व कार्यासन लिपीक, आस्थापना विभाग, म.न.पा. जळगांव.

**प्रत माहितीसाठी :-**
१) उपायुक्त (सा.प्र.), म.न.पा. जळगांव.
२) मुख्य लेखा परिक्षक

E:\EST WINDOWS १०\आस्थापना विभाग\वेतन लिपिक\कालबद्ध पदोन्नतीचे स्वतंत्र प्रस्ताव व इतिवृत्तास मान्यता देण्यात सुधारीत २६५९०.docx

Scanned with CamScanner